# पिंपरी चिंचवड महानगरलिका,पिंपरी 411 018

## आचार्य अत्रे रंगमंदिर

## (म्यॅन्युअल क्र.१७)

## इतर माहिती

रंगमंदिराचे आरक्षणासंबंधी महत्वाची माहिती

१) रंगमंदिराचे आरक्षणासाठी नियमानुसार असलेली अनामत रक्कम भरले शिवाय आरक्षण करता येत नाही.

२) आरक्षण केलेल्या दिनांकापासून ७ दिवस आगोदर नियमानुसार भाडे भरणे आवश्यक आहे.

३) भाडे भरलेची पावती कार्यक्रमाचे वेळी रंगमंदिरावरील कर्मचा-यास दाखविले नंतरच कार्यक्रम सुरु करता येईल.

४) केलेले आरक्षण र¤ü¤ü¤üद्द करावयाचे झालेस कमीतकमी ७ दिवस आगोदर रंगमंदिर कार्यालयास कळविणे आवश्यक आहे अन्यथा रद्य कार्यक्रमाचे भाडे भरावे लागेल.

५) रंगमंदिर आवारात बाहेरुन खाद्यपदार्थ आणता येणार नाही.

६) आवश्यक तो पोलिस परवाना घेणे संबंधीत संस्थेवर बंधनकारक राहील व सदरचा परवाना कार्यक्रमाचे वेळेस त्यांचे जवळ असणे गरजेचे आहे.

७) रंगमंदिर आवारात खड्डे खोदणेस तसेच मंडप घालणेस सक्त मनाई आहे.

८) रंगमंदिर आसन क्षमता ८५० इतकी असून त्यापेक्षा जास्त प्रेक्षक वर्ग येणार नाही याची दक्षता संबंधीत संस्थेने घ्यावयाची असून

त्यापेक्षा जास्त येणा-या प्रेक्षकांना रंगमंदिराचे कार्यालयातर्फे मज्जाव केला जाईल.

९) रंगमंदिर मालमत्तेचे कार्यक्रमाचे वेळेस नुकसान झालेस याची नुकसान भरपाई संबंधीत संस्थेस द्यावी लागेल.

१०) रंगमंदिर मोफत देणेकामीची तरतूद कायद्यात नसलेने मोफत मिळणेकामी प्रयत्न करु नये.